मराठी अस्मितेचा बुलंद आवाज!

# वृत्तमानस

वर्ष: १७, अंक : २५५ ■ मुंबई, मंगळवार, १ एप्रिल २०१४ ■ पाने - ८ ■ किंमत : ३ रुपये कार्यकारी संपादक – जी. एम. गोसावी

## आदिवासी मुलींना तंत्रज्ञानाच्या मदतीने सक्षम करण्याचा प्रयत्न



प्रतिनिधी

कल्याण, दि. १ : पोटाची खळगी भरण्यापुरते शिक्षण त्यांनी घेतले, पण मार्गदर्शनाचा अभाव, तर काही वेळेस परिस्थितीमुळे त्यांना रोजगार मिळू शकला नाही. अशा साक्षर आदिवासी मुलींना एकत्र आणून तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांना सक्षम करण्याचा प्रयोग सध्या ठाण्यात सुरू आहे. ठाण्यातील तरुणींबरोबरच जर्मनी आणि ऑस्ट्रियातील तरुणीही या प्रयोगाला हातभार लावत आहेत. अनंताश्रम आणि क्रिएटिव्ह रिस्पॉन्सिबल एटींग्रेटेड (क्रायसेस) या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सुरू आहे.

येऊर येथील अनंताश्रमात सध्या जव्हार आणि वाडा तालुक्यातील सोनाली चौधरी, वैशाली दिवे, वैशाली भोईर, राधिका खुताडे, मंगला घाटाळ, नीलम जाधव, ऋचा, रेखा अशा १० तरुणी आयटीचा २ वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत. शिकता- शिकता मिळणाऱ्या स्टायपेंडमुळे त्या स्वावलंबीही होत आहेत. क्रायसेस कंपनीच्या माध्यमातून त्या जैन, संस्कृत, प्राकृत पोथ्यांचे डिजीटायझेशन करत आहेत. त्याचबरोबर जर्मन, अरेबिक या भाषा आणि त्यांचे संवाद कौशल्य आत्मसात करत असल्याचे या प्रकल्पाच्या प्रमुख अपूर्वा आगवण यांनी सांगितले.

हिंदी, मराठी, गुजराती भाषेतील डेटा एन्ट्री तसेच डीटीपीची कामेही या मुली करत आहेत. या प्रकल्पासाठी लागणारे सॉफ्टवेअर ग्लेन फर्नांडीस यांनी तयार केले आहे. आयटीसाठी लागणारी सर्व कौशल्ये या मुलींनी आत्मसात करावीत, यासाठी अपूर्वा आगवण यांच्याबरोबरच डॉ. सरिता परीख, क्लारा कोपेल आणि एलिझा या परदेशी तरूणीही झटत आहेत. या मुलींनी स्वावलंबी व्हावे, अशी आपली इच्छा असल्याचे अनंताश्रमचे प्रा. भास्कर लाड यांनी सांगितले. येत्या जूनपासून या प्रकल्पात आणखी ६० मुलींचा समावेश होणार आहे.

### संस्था देणार पाठबळ

क्रायसेस कंपनी एंटरप्रायझेस रिसोर्स प्लॅनिंग, पब्लिशिंग, डेटा एन्ट्री, डीटीपी आणि आऊटसोर्सिंगची कामे करते. क्रायसेसच्या वतीने मुलींना दोन वर्षांचे आयटीचे ट्रेनिंग देण्यात येते. हे प्रशिक्षण घेऊन त्यांनी आपापल्या भागात जाऊन अशाच प्रकारचे प्रशिक्षण आपल्या बहिण- भावांना, मित्र- मैत्रिणींना देऊन त्यांनाही स्वावलंबी करावे, यासाठी संस्था या मुलींना सर्व प्रकारचे पाठबळ देणार आहे. या उपक्रमासाठी समाजाच्या हातभाराची गरज आहे. अधिक माहितीसाठी- ९१६७०२३३३५ या क्रमांकावर संपर्क साधावा.